



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. ४ ऑक्टोबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## उजनीचे अर्धशतक पूर्ण

**सोलापूर** : सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातील पाण्याच्या पातळीने अर्धशतक पूर्ण केले. मंगळवारी सायंकाळी प्लसमधील टक्केवारी ५०.३३ टक्के झाली. दौंडमधून विसर्ग कमी झाला आहे. तो आता १८ हजार १७५ क्युसेक झाला आहे.विसर्ग कमी झाला तरी धरणाच्या पातळीत अजून वाढत होत राहील, असे धरण व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. उजनी ५० टक्के भरल्यास सोलापूर जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचा तसेच सीना-भीमा नदीकाठच्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न मिटेल,असे जाणकारांनी म्हटले होते.त्यानुसार उजनी ५० टक्के भरली.दौंडमधून सतत विसर्ग असल्याने टक्केवारी अजून वाढत राहाणार आहे.

# मृत्यूचा 'वनवास' संपेच ना!

## ▸▸ संभाजीनगरमध्येही १० रूग्ण दगावले
## ▸▸ नांदेडमध्ये आणखीन ७ जणांनी प्राण सोडले

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**नांदेडमध्ये काळ रूग्णांच्या हात धुवून मागे लागला आहे.मंगळवारी पुन्हा ७ जणांनी औषध न मिळाल्याने मान टाकली.त्यामुळे ४८ तासात मृतांची संख्या ३१ झाली.नांदेडच्या प्रकरणावरून राज्यात राजकारण सुरू झाले असून सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप करत दौरे करत सुटले आहेत तर रूग्णांचे नातेवाईक औषधांच्या चिठ्ठ्या घेवून वणवण भटकत आहेत. दरम्यान नांदेडपाठोपाठ मृत्यूने छत्रपती संभाजीनगरची पाठ धरली आहे.संभाजीनगरमधील घाटी हॉस्पिटलमध्ये औषधांअभावी गेल्या चोवीस तासांत दोन नवजात बालकांसह १० जणांचा मृत्यू झाल्याने राज्यात भीतीचे वातावरण पसरले आहे.**

नांदेड येथील रुग्णालयामध्ये ४८ तासांत ३१ रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच छत्रपती संभाजीनगर शहरातील घाटी रुग्णालयामध्ये २४ तासांत दोन नवजात बालकांसह १० जणांचा मृत्यू झाला. घाटी रुग्णालयामध्ये औषधांचा तुटवडा असल्यामुळे रुग्णांना औषधांच्या चिठ्ठ्या घेऊन वणवण फिरावे लागत आहे. मृतांची ही आकडेवारी समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे.

मराठवाड्यासह वेगवेगळ्या जिल्ह्यातील रुग्णांसाठी संजीवनी ठरणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मोठ्या संख्येने रुग्ण येत असतात. यामुळे घाटी रुग्णालयावर मोठा भार आहे. त्या तुलनेत रुग्णालयाला पुरेसा निधी मिळत नाही.

परिणामी घाटी रुग्णालयामध्ये नेहमीच औषधांचा तुटवडा जाणवतो.

दिवसाला हजारो रुग्णांवर उपचार आणि शस्त्रक्रिया होणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय घाटी रुग्णालयामध्ये एकूण १,१७७ खाटा आहेत. तरी या खाटांमध्ये प्रत्यक्ष भरती होणाऱ्या रुग्णांची संख्या १५०० ते १७०० दरम्यान आहे. यामध्ये ६० ते ७० दररोज प्रसुती होत असतात. घाटी रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभागाची रोजची संख्या १५०० ते २००० च्या दरम्यान आहे. तसेच रोजची ओपीडी ही २००च्या जवळपास जाते. एवढ्या मोठ्या रुग्णांचा गराडा सांभाळणाऱ्या घाटी रुग्णालयामध्ये पुढील १५ दिवस पुढील एवढाच औषध साठा असल्याचे सांगण्यात आले. यामुळे अशीच परिस्थिती असेल तर मृत्यू होणाऱ्या रुग्णांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.


आता तरी जागे व्हा!
अग्रलेख
पान २ वर




**मातेचा हंबरडा** : नांदेडमधून आणखी एक कहाणी समोर आली आहे. याठिकाणी एक आई तिच्या डेंग्यू झालेल्या मुलाला घेऊन आली होती. मात्र, याठिकाणी मुलभूत सुविधांची वानवा असल्यामुळे या आईवर आक्रोश करण्याची वेळ आली. या आईने प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आपली करुन कहाणी सांगितली. माझ्या १४ वर्षाच्या मुलाला डेंग्यू झाला. मी उमरखेडहून नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी आणले. येथे कुठलीच सुविधा नाही. औषधं देखील बाहेरून आणावी लागतात. जवळ पैसे नाहीत, आता मी काय करू, असे म्हणत एका मुलाच्या आईने हंबरडा फोडला आहे. यमुना नरवाडे असं या महिलेचे नाव आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड येथील त्या रहिवासी आहेत.




### खासदार झाले आक्रमक 'डीन'ना स्वच्छतेची दिली शिक्षा

नांदेड मृत्यू प्रकरणानंतर खासदार हेमंत पाटील यांनी मंगळवारी या रूग्णालयांना भेट देवून विविध विभागांची पहाणी केली. शिवसेना शिंदे गटाचे खासदार हेमंत पाटील यांनी रुग्णालयात दाखल होत पाहणी केली. हेमंत पाटील यावेळी आक्रमक झाले होते. यावेळी त्यांनी रुग्णालयाचे अधिष्ठाता एस. आर. वाकोडीकर यांना स्वच्छतागृहाची साफसफाई करायला लावली. त्यांच्या या कृतीबद्दल उलटसुलट चर्चा होत आहे. अनेक वार्डातील स्वच्छतागृह बंद होती. अनेक ठिकाणी स्वच्छतागृहातील वस्तूंची नासधूस, तोडफोड झाल्याचे दिसून आले. संतप्त झालेल्या खासदार हेमंत पाटील यांनी हातात पाण्याचा पाईप घेऊन तेथील वैद्यकीय अधिष्ठाता एस. आर. वाकोडीकर यांच्याकडून बाथरूम स्वच्छ करून घेतले. परिसरातील अस्वच्छतेची पाहणी केली. वैद्यकीय अधीक्षक यांच्याकडील असलेल्या कार्यालयीन रजिस्टर त्यांनी तपासणी केली. विष्णुपुरी रुग्णालयातील आणि परिसरातील अस्वच्छते बद्दल तीव्र संताप व्यक्त केला. स्वच्छता निरीक्षक यांना देखील धारेवर धरले.

## पोलीस हवालदाराच्या मुलाची आत्महत्या

**सोलापूर** : पोलीस हवालदाराच्या अल्पवयीन मुलाने सिलिंग फॅनला गळफास घेऊन आत्महत्या केली.ही हृदयद्रावक घटना सोलापुरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या अरविंद धाम सोसायटीत मंगळवारी दुपारी घडली. सोळा वर्षीय पृथ्वीराज गणपतसिंग चव्हाण असं मृताचे नाव असून त्याच्या आत्महत्त्येमागील कारण स्पष्ट झाले नाही.पृथ्वीराज हा इयत्ता दहावीमध्ये शिकत होता.



अरविंद धाम सोसायटीतील ब्रह्मपुत्रा इमारतीतील वास्तव्यास असलेले पोलीस हवालदार गणपतसिंग चव्हाण यांचा मुलगा पृथ्वीराज यांनी सिलिंग फॅनला कपड्याच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर त्याच्या आप्तेष्टांनी त्यास खाली उतरविले.हा प्रकार दुपारी पावणेदोन च्या सुमारास घडला.फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक एन. सी. कामूर्ती यांनी दवाखाना यादीसह बेशुद्ध अवस्थेत असलेल्या पृथ्वीराजला शासकीय इस्पितळात दाखल केले. मात्र त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.या घटणेबाबत पुढील तपास चालू असल्याचे फौजदार चावडी पोलीसांनी सांगितले.

## पंढरपुरात समता नगरात चोरी

**सोलापूर** : पंढरपूर येथे एका महिलेच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने रोख रकमेसह ६० हजार ३०० रुपयांचे दागिने पळविले. ही चोरी रविवारी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली. यासंदर्भात रत्नप्रभा चांगदेव पाटील (रा. समतानगर,अश्वमेध हॉटेलच्या पाठीमागे) यांनी पंढरपूर शहर पोलिसात नुकतीच फिर्याद दाखल केली. त्या ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी घराला कुलूप लावून गेल्या होत्या . दुसऱ्या दिवशी रात्री परतल्यानंतर त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून घरातील अडीच हजार रुपये रोख, १४ ग्रॅम सोन्याचे आणि इतर चांदीचे दागिने पळवले.

## बाळगी येथे बांबूने मारून ३ दात पाडले

**सोलापूर** : भावकीतील भांडणातून बांबू आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून ६० वर्षीय इसमाचे ३ दात पाडून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना बाळगी (ता. दक्षिण सोलापूर) येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

श्रीशैल संगण्णा बुगडे (वय ६० रा.बाळगी ता.दक्षिण सोलापूर) असे जखमींचे नाव आहे. त्यांना मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात गंभीर अवस्थेत दाखल करण्यात आले. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवानंद व्हनप्पा बुगडे, त्याची दोन मुले शिवानंद आणि मल्लिकार्जुन बुगडे (रा.बाळगी) या तिघांविरुद्ध मंद्रुपच्या पोलीसांनी गुन्हा दाखल केला. काल सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास श्रीशैल बुगडे हे धरेप्पा पिरगुंडे यांच्यासोबत गावातील बिज्जरगी यांच्या शेताजवळ बोलत बसले होते.

त्यावेळी शिवानंद बुगडे सह तिघे घटनास्थळी आले. त्यापैकी शिवानंद याने बांबूने यांच्या तोंडावर मारले. त्यात त्यांचे दात पडले. तर त्याच्या दोघा मुलांनी देखिल मारहाण करून शिवीगाळ केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार गुंडाळे करीत आहेत.

## शिंदे-फडणवीस दिल्लीत अजितदादा गटाचे नेते देवगिरीवर जमले

सुराज्य/मुंबई

राज्यात मंगळवारी दिवसात बऱ्याच घडामोडी घडल्या आहेत. कोरोना काळातही कधी बैठकांना दांडी न मारणारे अजित पवार यांनी आज चक्क कॅबिनेट बैठकीला गैरहजेरी लावली. ते आले नाहीत म्हणून विचारल्यावर मुख्यमंत्री शिंदेंनी त्यांची तब्येत बरी नसल्याचे सांगितले आणि नंतर थोड्याच वेळात शिंदे-फडणवीस दिल्लीला रवाना झाले. यामुळे अजित पवार नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

राज्यात पडद्यामागे मोठ्या घडामोडी शिंदे-फडणवीसांचे विमान दिल्लीला उडाले तेव्हा सुरु झाल्या आहेत. अजित पवार गटाच्या नेत्यांनी देवगिरीकडे कूच करण्यास सुरुवात केली होती. आता तिथे जोरदार खलबते सुरु झाली आहेत. अजित पवार यांच्या निवासस्थानी पवार गटाच्या मंत्र्यांची बैठक सुरु झाली आहे. अजित पवारांना जर बरेच नाहीय तर मग हे नेते तिथे का जमले आहेत, असा सवाल निर्माण झाला आहे. भुजबळ यांना देवगिरीवर पत्रकारांनी घेरताच त्यांनी ही बैठक आधीच ठरलेली होती असे सांगितले. तसेच अजित पवारांच्या घशाला संक्रमण झाल्याचेही सांगितले. कॅबिनेट बैठकीला अजित पवार आले नाहीत तरी आमची बैठक देवगिरीवर होणार आहे. प्रफुल्ल पटेल या बैठकीत असणार आहेत. अजित पवारांना राजकीय आजारपण नाहीय, असे भुजबळ म्हणाले.

अजित पवार दिल्लीत होणाऱ्या जीएसटी काऊन्सिलच्या बैठकीला जाणार होते. ही बैठक ७ ऑक्टोबरला होणार आहे. मात्र, त्या बैठकीला देखील ते दिल्लीला जाणार नसल्याचे समजते आहे. यामुळे नक्कीच काहीतरी बिनसल्याचा अंदाज कार्यकर्ते लावू लागले आहेत.

## दांडक्याने मारून सासऱ्याचे नाक फॅक्चर केले

### जावयाविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर** : माझी पत्नी कुठे आहे ? तिला कुठे लपवून ठेवले ? असे म्हणत ८० वर्षीय वृद्ध सासऱ्याला लाकडी दांडक्याने मारून नाक फॅक्चर केल्याची घटना पिलीव (ता. माळशिरस) येथे रविवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात माळशिरसच्या पोलिसांनी जखमींच्या जावया विरुद्ध गुन्हा दाखल केला असून तो घटनेनंतर पसार झाला आहे. दादा यशवंत पाटील (वय ८० रा.झिंजेवस्ती पिलीव ता.माळाशिरस) असे जखमी झालेल्या वृद्धाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांच्या जावई बळीराम आत्माराम बिचुकले (रा.गारअकोले ता.माढा) याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.आरोपी बळीराम बिचकुले याची पत्नी पती बरोबर पटत नसल्याने ती पिलीव येथे माहेरी आली होती. रविवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास बळीराम बिचकुले हा सासरी आला. आणि हातात लाकडी दांडके घेऊन माझी बायको कुठे आहे, तिला कुठे लपवून ठेवले ? असे म्हणत डोकीवर मारले त्यानंतर त्याच दांडक्याने नाकावर मारल्याने त्यांच्या नाकाचे हाड मोडून ते गंभीर जखमी झाले. अशी नोंद माळशिरस पोलिसात झाली. पुढील तपास फौजदार पुजारी करीत आहेत.

## मुलाने आईचा गळा दाबला तर वडिलांना मारहाण

### माळीनगर येथील घटना

**अकलूज** : लग्नासाठी मुलगी का बघत नाही ? असे म्हणत आईला लाथाबुक्याने मारहाण करून गळा दाबला. त्यानंतर हातातील कड्याने वडिलांना मारून त्यांचे हात फ्रॅक्चर केले.

ही घटना माळीनगर येथील काटे कॉम्प्लेक्स येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी जखमींचा मुलगा राकेश संजय धडके (वय २८) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

संजय धडके (वय ६५) आणि त्यांची पत्नी वैशाली (दोघे रा.काटे कॉम्प्लेक्स, माळीनगर) अशी जखमी दांपत्याची नावे आहेत. या संदर्भात जखमी संजय धडके यांनी अकलूज पोलिसात फिर्याद दाखल केली. शुक्रवारी रात्री धडके दांपत्य घरात झोपले होते. त्यावेळी गणपती विसर्जन करून त्यांचा मुलगा राकेश नशेत घराच्या दरवाजावर लाथाने मारहाण केली. दरवाजा उघडल्यानंतर तुम्ही माझ्या लग्नासाठी मुली का बघत नाही ? असे म्हणत आईला मारहाण करून गळा दाबला. संजय धडके हे पत्नीला सोडविण्यासाठी मध्ये पडले असता त्याने हातातील तांब्याच्या कड्याने त्यांना मारहाण केली. दरम्यान वैशाली यांनी रागाच्या भरात विषारी द्रव प्राशन केले. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार कुंभार करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



घरीच थांबेन, पण सरकारी दवाखाना नको.. म्हणताहेत!


कल्याण
355-33-256

मुंबई
369-83-337


# पिकअप चिखलात; एटीएम चोरीचा बेत फसला!

## ▸▸ एटीम फोडून पैसे लंपास, पोबारा करणारे चार चोरटे गजाआड
## ▸▸ चोरट्यांना ग्रामस्थांच्या मदतीने पकडण्यात माढा पोलिसांना यश

सुराज्य/माढा

पिकअप चिखलात फसला अन् एटीएम मशीन चोरीचा बेत फसला. ही घटना घडली माढा पोलिस ठाणे हद्दीत घडली. चोरट्यांनी राशीन (जि. अहमदनगर) येथील हिताची कंपनीचे एटीम मशीन चोरले. पिकअपमध्ये एटीएम मशीन घेऊन जाताना नेमका पिकअप चिखलात फसला. आणि चोरट्यांच्या चोरीच्या प्रयत्नावर पाणी फेरले गेले. चोरट्यांनी गॅस कटरने मशीन फोडून त्यातील पैसे चोरून पोबारा करण्याचा प्रयत्न करीत असतानाच माढा पोलिसांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने त्यांना तात्काळ गजाआड केले.



मंगळवारी पहाटे घडलेल्या या घटनेचे धागेदोरे सोलापूर जिल्ह्यात असल्याने वरिष्ठांच्या आदेशाने माढा पोलिसांना ग्रामस्थांच्या सहकार्यातून चोरट्यांना जेरबंद करण्यात यश आले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष देशपांडे यांनी स्वतः माढा पोलीस ठाणे गाठले. राशीन येथील दोशी पेट्रोल पंपाजवळील हिताची कंपनीचे एटीम मशीन गायब झाल्याचे पहाटे पावणेसात वाजता लक्षात आल्यानंतर संबधितांनी तेथील पोलिसांत तक्रार दाखल केली. दरम्यान ही घटना पोलीस ग्रुपवरती व्हायरल झाली. त्यानंतर तात्काळ सतर्कता बाळगून सर्वत्र नाकेबंदी करण्यात आली.

माढा पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी घोळवे यांना लोंढेवाडी उपळाई खुर्द परिसरात संशयित घटनेची खबर मिळाली. त्यांनी पोलीस निरीक्षक खळदाने आणि कर्मचाऱ्यांसह त्या ठिकाणी धाव घेतली. लोंढेवाडी ते पाचवा मैल परिसरात एटीम मशीनसह पिकअप त्यांना आढळून आली. चिखलात पिकअप फसल्याने गॅस कटरच्या साह्याने मशीन फोडून पैसे घेऊन चोरटे पसार झाले होते.

दरम्यान याकामी वाकाव खैराव मानेगाव येथील पोलीस पाटील आणि ग्रामस्थ यांचे मोठे सहकार्य पोलिसांना लाभले. त्यानिमित्त त्यांचा यथोचित सन्मान करणार असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष देशपांडे यांनी यावेळी सांगितले.

### आरोपी हे सोलापूर जिल्ह्यातीलच संशयित

संबधित आरोपी हे सोलापूर जिल्ह्यातील असल्याचे सांगण्यात येत असून, पाचव्या आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत. पोलिसांनी अधिक तपास केल्यानंतर या गुन्ह्यात पाच आरोपी असल्याचे निष्पन्न झाले असून, त्यापैकी ४ जणांना अटक करण्यात आली आहे. नेमकी किती रक्कम लंपास केली हे पाचवा आरोपी हाती आल्यावर सांगता येईल, असेही देशपांडे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस पोलीस उपअधीक्षक हिम्मतराव जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक खळदाणे, स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीणचे सुरेश निंबाळकर, पोलीस निरीक्षक शशिकांत शेळके, कर्जत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक घनश्याम बळप, स्थानिक गुन्हे शाखेचे सहा. पो नि.शशीकांत शेळके आदी उपस्थित होते.